




दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ६ । अंक २५ । बुधवार १४ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322




सोमवंशी क्षत्रिय कासार समाज श्री कालिका देवी, अहिल्यानगर तिसरी माळ, वाहन- वाघ मूर्तिकार श्री धनंजय वेळापुरे. छाया- विशाल येंडे.

## केडगावमधील घरफोडीचा अवघ्या २४ तासांत छडा

### कोतवाली पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईत साडेआठ लाखांचे सोने हस्तगत




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव उपनगरातील एका घरातून चोरीस गेलेले सुमारे साडेआठ लाख रुपये किमतीचे सात तोळे सोन्याचे दागिने अवघ्या २४ तासांच्या आत हस्तगत करण्यात कोतवाली पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका तरुणाला अटक केली असून, त्याच्या अल्पवयीन साथीदारालाही ताब्यात घेतले आहे.

केडगाव मधील छत्रपती टॉवर येथील रहिवासी श्रद्धा विठ्ठलराव जाधव (वय २९) या १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी नवीन घर पाहण्यासाठी आईसोबत बाहेर गेल्या होत्या. घरात त्यांची बहीण स्मृती व तिचा मुलगा असताना, स्मृतीचा मित्र विवेक विजय वहाडणे (वय २०, रा. अंबिकानगर, केडगाव) हा एका विधीसंघर्षित बालकासह तिथे आला होता. दोघे बेडरूममध्ये जाऊन ■ पान ४ वर

## दिव्यांग केंद्रासाठी जागा व इमारत उपलब्ध करून देणार - आयुक्त डांगे

### महानगरपालिका शिक्षण विभाग व रिमांड होमच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, कृत्रिम अवयव व शैक्षणिक किटचे वाटप । महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते साहित्य वितरण; विद्यार्थ्यांच्या गायनाने उपस्थित मंत्रमुग्ध




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिव्यांग विद्यार्थी अफाट क्षमता आणि प्रचंड बुद्धिमत्ता असलेले असतात. मात्र, समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत असून, त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाचीही जबाबदारी आहे. याच दृष्टिकोनातून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच शहरात स्वतंत्र दिव्यांग केंद्र सुरू करण्यासाठी लवकरच जागा आणि इमारत उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभाग, रिमांड होम आणि रेणुकानगर केंद्र यांच्या वतीने मंगळवारी (दि. १३) महानगरपालिकेत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, कृत्रिम अवयव आणि शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले. यावेळी नगरसेवक महेश लोंढे, सतीश शिंदे, दिव्यांग विद्यार्थ्यांचे पालक आणि संबंधित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी विशेष शिक्षक प्रचंड मेहनत घेत आहेत. हे विद्यार्थी मोठे झाल्यानंतर समाजाच्या मुख्य प्रवाहात यावेत आणि इतर विद्यार्थ्यांप्रमाणे सन्मानाने जीवन जगता यावे, हा या प्रयत्नांमागील मुख्य उद्देश आहे. विशेष शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने परिश्रम घेत असून, त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

आज वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लागेल. सामान्य विद्यार्थ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याबरोबरच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आत्मविश्वास आणि प्रगतीची नवी उमेद निर्माण करण्याचे काम विशेष शिक्षक करत आहेत. या शिक्षकांना भविष्यात कोणत्याही प्रकारची मदत आवश्यक असल्यास महानगरपालिकेच्या वतीने तातडीने सहकार्य करण्यात येईल. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र केंद्र सुरू करण्याच्या दृष्टीने जागा आणि इमारत उपलब्ध करून दिली जाईल. यासंदर्भात महापौर व उपमहापौर यांच्याशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्यात येईल, असे आयुक्त डांगे यांनी स्पष्ट केले.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, समाजात वावरताना ■ पान ४ वर

## मतदारसंघात टँकर, चारा छावण्या सुरू कराव्यात

### उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची आमदार दातेंनी घेतली भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या दुष्काळी परिस्थितीची दखल घेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांची मुंबई येथे भेट घेऊन मतदारसंघातील जनतेच्या व्यथा आणि पाणीटंचाईचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले. दुष्काळाच्या झळांनी सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि पशुपालक त्रस्त होत असताना जनतेला दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली यावेळी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड उपस्थित होते.




> दुष्काळाच्या कठीण काळात नागरिकांना पिण्याचे पाणी आणि पशुधनाला चारा उपलब्ध करून देणे ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून ग्रामीण जनजीवन टिकवून ठेवण्याची गरज आहे. दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि ग्रामीण जनजीवन यांचे प्रश्न अत्यंत संवेदनशील बनतात. अशा वेळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने वेळ न दवडता निर्णय घेणे आवश्यक आहे.
>
> आमदार काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, यासाठी लवकरात लवकर पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत, तसेच पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक असलेल्या इतर उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी आग्रही मागणी आमदार दाते यांनी यावेळी केली.

दुष्काळाचा फटका केवळ नागरिकांनाच नव्हे, तर पशुधनालाही बसत आहे. जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संगोपन करणे शक्य व्हावे आणि पशुपालकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये, यासाठी चारा छावण्या किंवा चारा डेपो लवकरात लवकर सुरू करण्याची मागणीही त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली.

## दिवाळी तोंडावर, पेन्शनर्सचा आक्रोश; महापालिकेच्या प्रवेशद्वारात हलगीचा कडकडाट!

### पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या आयोगाचे आठ हप्ते दिवाळीपूर्वी देण्याची मागणी; ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर । हलगी वाजवून महापालिका प्रशासनाचे वेधले लक्ष



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांवरून आंदोलन तीव्र होऊ लागले आहे. पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते आणि दरमहा वेळेवर पेन्शन मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन सुरू आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी (दि. १४ ऑक्टोबर) आंदोलकांनी हलगी वाजवून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. हलगीच्या कडकडाटासह करण्यात आलेल्या निदर्शनांतून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी जोरदार आवाज उठविला.

संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून, न्यायालयीन निर्णयानुसार महापालिकेतील ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक मिळणे अपेक्षित आहे. मात्र, संबंधित रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. या आंदोलनात उपाध्यक्ष वसंत थोरात, मिलिंद वैद्य, कार्याध्यक्ष डी. यू. देशमुख, रंगनाथ गावडे, संजीव परशरामी, मधुकर खताळ, शेखर वैद्य, अन्वर शेख, मुस्ताक शेख, अनिस खान, सतीश वाघ, मंजूर शेख, गुरु टेपाळे, ज्ञानेश्वर धिरडे, दिलीप पाठक, नंदू डापसे, राजेंद्र सस्कर, रवी भारताळ, सुधाकर काशिद, हिरामन जाधव, आर.बी. कदम, गोरक्षनाथ तेलोरे, ठोकळ, अरुण घोडबंदर, प्रमोद मुळे, मुलानी, राजेंद्र बेंद्रे, सौ. रंजना भोसले, लता महाले, मिरा चव्हाण, अंकुश कोतकर, अशोक विधाटे, रफिक शेख, संजय दगडे, मिलिंद नराल, जगदीश घोरपडे, बबन आढाव, राजू मेढे, बाळासाहेब नलगे, सुधाकर काशीद, हुसेन शेख, सादिक शेख, दत्तात्रय फडके यांच्यासह मोठ्या संख्येने सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत.

आपल्या सेवाकाळात महापालिकेच्या कामकाजासाठी योगदान दिल्यानंतर निवृत्त जीवनात आर्थिक स्थैर्य मिळणे अपेक्षित असताना, हक्काच्या देय रकमांसाठी आंदोलन करण्याची वेळ आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. न्यायालयीन निर्णयानुसार देय असलेली रक्कम ■ पान ४ वर

## पिचडगावात वहिवाट रस्ता दशकानंतर खुला

### नेवासेत शिव–पानंद चळवळीला यश; ना पोलीस बंदोबस्त, ना वाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासे–** तालुक्यातील पिचडगाव शिवारात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला शेतकरी बाबासाहेब शिरसाठ यांचा वहिवाटीचा रस्ता अखेर सामंजस्यातून खुला झाला आहे. यासाठी संबंधित शेतकरी, शिव–पाणंद रस्ते चळवळ कार्यकर्ते व मंडळधिकारी सरिता मुंडे यांची भूमिका महत्वाची ठरली. दरम्यान, रस्ता खुला झाल्याने शिरसाठ कुटुंबासह परिसरातील शेतकऱ्यांचा शेतीमाल वाहतुकीचा अनेक वर्षांचा मोठा प्रश्न सुटला आहे.

नेवासेचे तहसीलदार संजय बिराजदार यांच्या आदेशानुसार ही कार्यवाही पार पडली. मंडलाधिकारी सरिता मुंढे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह शेतावर जाऊन दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना विश्वासात घेतले. शिवपानंद चळवळ कार्यकर्त्यांनीही मध्यस्थी करत सकारात्मक वातावरण तयार केले. त्यामुळे निवृत्ती जावळे, सुभाष टिळेकर, कारभारी औताडे, महेश धीवरे, बाबासाहेब शिरसाठ, अभिषेक शिरसाठ या सर्व शेतकऱ्यांनी सहकार्याची भूमिका घेत स्वतःहून रस्ता खुला करून दिला.

दरम्यान, या रस्ता खुला करण्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हा वहिवाट रस्ता खुला करण्याचे ठरल्याने या ठिकाणी कोणताही पोलीस बंदोबस्त लावावा लागला नाही. कोणताही वाद–विवाद न होता, केवळ संवाद आणि सामंजस्यातून हा प्रश्न शेतकऱ्यांनी मंडळाधिकारी सरिता मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.

यावेळी शिवपानंद शेतरस्ता ■ पान ४ वर

**भानसहिवरेत १६ रस्त्यांचा श्वास मोकळा**

मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्ते योजना आणि पाणंद रस्ते योजना या महत्वकांक्षी योजनेची नेवासे तालुक्यातील भानसहिवरे मंडळाधिकारी सरिता मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रभावी अंमलबजावणी करत अनेक दशके वादात बंद असलेल्या ८ शिवरस्ते, १ पानंद रस्ता, ५ रस्ते ५/२ तर २ रस्ते १४३ नुसार असे तब्बल १६ विविध रस्त्यांचा श्वास मोकळा केला आहे.

## बुऱ्हानगर देवीला साडी–चोळी अर्पण

### एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी शिवसेनेचे साकडे । स्वर्गीय अनिल राठोड यांनी सुरू केलेली परंपरा कायम । नवरात्रोत्सवातील तिसऱ्या माळेच्या यात्रेनिमित्त धार्मिक विधी





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवरात्रोत्सवातील तिसऱ्या मानेच्या यात्रेनिमित्त सालाबादप्रमाणे बुऱ्हानगर येथील देवीला साडी–चोळी अर्पण करून दर्शन घेण्यात आले. माजी मंत्री स्वर्गीय अनिल राठोड यांनी सुरू केलेली ही परंपरा शिवसेनेच्या वतीने यंदाही जपण्यात आली. यावेळी शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे यांची वर्णी लागावी, यासाठी बुऱ्हानगरच्या देवीला शिवसेनेच्या वतीने साकडे घालण्यात आले.

नवरात्रोत्सवात बुऱ्हानगर येथील देवीच्या यात्रेला विशेष महत्त्व आहे. या यात्रेनिमित्त देवीला साडी–चोळी अर्पण करण्याची परंपरा स्वर्गीय अनिल राठोड यांनी सुरू केली होती. धार्मिक श्रद्धा आणि शिवसेनेच्या परंपरेचे प्रतीक म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जाते. राठोड यांनी सुरू केलेल्या या परंपरेचे स्मरण करीत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी देवीचे दर्शन घेतले आणि राज्याच्या राजकीय वाटचालीसह जनतेच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली.

संभाजी कदम म्हणाले, ''स्वर्गीय अनिल राठोड यांनी सुरू केलेली परंपरा पुढे नेणे हे आमच्यासाठी श्रद्धेचे आणि भावनिक जिव्हाळ्याचे काम आहे. त्यांनी अहिल्यानगर शहरात शिवसेनेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले. धार्मिक परंपरा जपत समाजाशी जोडलेली नाळ कायम ठेवण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्याच विचारांचा वारसा पुढे नेत दरवर्षीप्रमाणे यंदाही बुऱ्हानगर च्या देवीला साडी–चोळी अर्पण करण्यात आली. देवीच्या आशीर्वादाने ही परंपरा पुढील काळातही अखंड सुरू राहील.''

''एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या भावना आणि अपेक्षा लक्षात घेता, एकनाथ शिंदे यांची राज्याच्या मुख्यमंत्रीपदी वर्णी लागावी, यासाठी आम्ही बुऱ्हानगर च्या देवीला साकडे घातले आहे. राज्यातील जनतेला सुख–समृद्धी लाभावी, शेतकरी, कष्टकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मार्गी लागावेत, तसेच महाराष्ट्राची प्रगती व्हावी, अशीही देवीच्या चरणी प्रार्थना केली आहे,'' असे संभाजी कदम यांनी सांगितले. ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरमध्ये प्रथमच फक्त महिलांसाठी लाईव्ह दांडीया नाईटचे २०२६ चे आयोजन

अहिल्यानगर - नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात प्रथमच फक्त महिलांसाठी भव्य लाईव्ह दांडीया नाईट २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. नगर जल्लोष ट्रस्ट आणि आयोजित या कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक प्रतिष्ठा एथनिक असून शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता संजोग लॉन्स, सावेडी येथे हा रंगतदार सोहळा होणार आहे. या दांडीया नाईटचे प्रमुख आकर्षण अभिनेत्री धनश्री कडगावकर (तुझ्यात जीव रंगला फेम - वहिनीसाहेब) असणार आहेत. त्यांच्यासोबत प्रसिद्ध सेलिब्रिटी अँकर आणि गायक संदीप पाटील, छबीदार छबी... गाजलेली गायिका मुग्धा कऱ्हाडे आणि इंडियन आयडॉल फेम गायक कैवल्य केजकर लाईव्ह परफॉर्मन्सने धमाल उडवून देणार आहेत.महिला सुरक्षेला आणि मनोरंजनाला प्राधान्य देत आयोजित या कार्यक्रमात सहभागी महिलांसाठी आकर्षक लकी ड्रॉ ठेवण्यात आला आहे. यामध्ये ०९ मनमोहक पैठणी साड्या कस्तुरी साडीज यांच्या वतीने आणि सहदेव ज्वेलर्स कडून ०९ सोन्याच्या सुंदर नथींचा महा लकी ड्रॉ जिंकण्याची संधी मिळणार आहे. प्रवेश शुल्क केवळ ३९९ रुपये असून प्रत्येक प्रवेशिकेवर स्नॅक्स आणि पाण्याची बॉटल मोफत दिली जाणार आहे. या कार्यक्रमाचे प्रायोजक सहदेव ज्वेलर्स, तर सहप्रायोजक कुबेर मार्केट, व्ही प्लस,स्वामिनी मेकअप आहेत., सशुल्क पासेससाठी शहरातील प्रमुख ठिकाणी संपर्क केंद्र सुरु करण्यात आले आहेत. भिस्तबाग चौक येथे सहदेव ज्वेलर्स (०२४१-२३५५४७४), शिंगवी ज्वेलर्स (८६०५५०००२५), कुष्ठधाम रोड येथे आदिश्री कलेक्शन (७२७६८००३००), झोपडी कॅन्टीन आरएम बिझनेस हब येथे प्रतिष्ठा एथनिक (९२८४८८४४७७), प्रोफेसर चौक येथे , चाणक्य चौक येथे स्वामिनी मेकओव्हर (७६२०१९५०१३) आणि मार्केट यार्ड येथे पारस शॉपी (८०८७७३१९१७) येथे सशुल्क पासेस उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ७७७४०७७८४४ / ९८६०६१२०४५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजक आणि नगर जल्लोष वतीने करण्यात आले आहे.

### फिर्यादीच आरोपी असलेल्या गुन्ह्यात चिरंजीव गाढवे यांचा जामीन न्यायालयाने फेटाळला

अहिल्यानगर - शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या कथित प्राणघातक हल्ल्याच्या प्रकरणाला तपासादरम्यान नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणात सुरुवातीला फिर्यादी असलेल्या चिरंजीव गाढवे यांनाच पोलिसांनी आरोपी म्हणून गुन्ह्यात समाविष्ट केले आहे. इतर व्यक्तींना गुन्ह्यात अडकविण्यासाठी स्वतःवरील हल्ल्याचा कट रचल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. या प्रकरणात चिरंजीव गाढवे यांनी दाखल केलेला जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने १२ ऑक्टोबर रोजी फेटाळला आहे. जामीन अर्ज फेटाळण्यात आल्यामुळे फरार असलेल्या चिरंजीव गाढवे यांच्या अडचणी वाढल्या आहे.या प्रकरणातील फिर्यादी चिरंजीव गाढवे यांनी आपल्यावर झालेला कथित हल्ला हा पप्पू शेठ आणि गौरव भाऊ यांच्या सांगण्यावरून करण्यात आल्याची फिर्याद तोफखाना पोलीस ठाण्यात दिली होती. या आरोपांच्या अनुषंगाने पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीच्या आधारे या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. पोलिसांच्या तपासानुसार, गाढवे यांनीच कथितरीत्या सुपारी देऊन स्वतःवर प्राणघातक हल्ला करवून घेतला आणि इतर व्यक्तींना गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न केला. या निष्कर्षानंतर पोलिसांनी गुन्ह्यात संबंधित कलमे वाढवून चिरंजीव गाढवे यांनाच आरोपी म्हणून समाविष्ट केले. आरोपी म्हणून नाव समाविष्ट झाल्यानंतर चिरंजीव गाढवे यांनी जिल्हा न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाच्या वतीने ॲड. गोरख मुसळे यांनी युक्तिवाद केला. आरोपीच्या कथित गुन्हेगारी पार्श्वभूमीचा तसेच प्रकरणाच्या तपासासाठी त्याच्या कोठडीची आवश्यकता असल्याचा मुद्दा सरकारी पक्षाने न्यायालयासमोर मांडला. सरकारी पक्षाचा युक्तिवाद आणि मांडण्यात आलेले मुद्दे विचारात घेऊन जिल्हा न्यायालयाने १२ ऑक्टोबर रोजी गाढवे यांचा जामीन अर्ज फेटाळला. तसेच या प्रकरणाच्या पुढील तपासासाठी आरोपीच्या कोठडीची गरज असल्याचे न्यायालयाने नमूद केले. या सुनावणीमध्ये सरकार पक्षातर्फे ॲड. गोरख मुसळे यांनी काम पाहिले.

## श्री बुऱ्हाणनगरच्या अंबिका माता मंदिरात माहेरवाशिन पालखीचे आगमन भक्तिभावाने स्वागत





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शारदीय नवरात्रोत्सवासाठी श्री क्षेत्र बुऱ्हाणनगरच्या देवी मंदिरातून श्री क्षेत्र तुळजापुरला जाणाऱ्या तुळजाभवानी देवीच्या मानाच्या पालखीचे पालखी यात्रा मार्गक्रमामध्ये आगमन मंगळवार दिनांक १३/१०/२६ रोजी सकाळी बुऱ्हाणनगर ( ता. नगर ) येथील श्री अंबिका तुळजाभवानी देवी मंदिरात उत्सहात स्वागत झाले. हजारो भाविकांच्या उपस्थितीत भक्तिपूर्ण वातावरणात ही मानाची पालखी वाजतगाजत व गुलालाची उधळण करत मंदिर परिसरात ठेवण्यात आली. यावेळी दर्शनास आलेल्या हजारो भाविकांनी आईराजा उदो उदो..., सदानंदीचा उदो उदो..., बोल तुळजाभवानी माताकी जय... असा जयघोष केला. पालखीचे वंशपरंपरागत मानकरी भगत कुटुंबीयांकडून पालखीचे उत्साहात व भक्तिभावाने स्वागत व पूजन करण्यात आले. मुख्य पुजारी ॲड.विजय भगत, ॲड विजय भगत व कविता भगत , सौ.दुर्गा भगत यांनी पालखीची आरती करून साडीचोळी अर्पण केली.

तुळजाभवानी देवीच्या मानाच्या पालखीच्या देवी मंदिरास ५ प्रदक्षिणा झाल्यावर पालखीची बुऱ्हाणनगर गावातून वाजतगाजत देवीच्या जयघोषात मिरवणुक काढण्यात आली. यावेळी हजारो भाविक उपस्थित होते. बुऱ्हाणनगर गावत पालखीचे स्वागत करण्यासाठी सर्व घरासमोर आकर्षक रांगोळ्या रेखाटून घरोघरी पालखीची भक्तिभावाने पूजा करण्यात आली. तत्पूर्वी तिसऱ्या माळे निमित्त सकाळी तुळजाभवानी देवीची विधिवत महापूजा पुजारी ॲड भगत परिवाराने केली. यावेळी देवीस परिधान केलेले उंची वस्त्रे, सुवर्ण व रजत अलंकार तसेच आकर्षक पुष्पमाळांमुळे देवीचे रूप अधिकच प्रसन्न व विलोभनीय दिसत होते. यात्रे निमित्त गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता. यावेळी पुजारी ॲड. अभिषेक भगत म्हणाले, कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या पालखीचा मान गेल्या एक हजाराहून अधिक वर्षांपासून बुऱ्हाणनगरच्या भगत परिवाराकडे आहे. श्री क्षेत्र तुळजापूर येथे विजयादशमीला तुळजाभवानी देवीचे सीमोल्लंघन नगरहून गेलेल्या याच पालखीमधून दरवर्षी होत असते. आज तिसऱ्या माळेच्या उत्सवाला संपूर्ण राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक बुऱ्हाणनगर येथे आले आहेत. सर्व भाविकांची मनोकामना पूर्ण करणारी ही देवी असल्याने भाविकांची मोठी श्रद्धा देवीवर आहे. देवीच्या आशीर्वादाने सर्वत्र मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. सकाळी पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमुक्काम यांनी येऊन देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले .

यावेळी पुजारी ॲड. अभिषेक भगत म्हणाले, कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या पालखीचा मान गेल्या एक हजाराहून अधिक वर्षांपासून बुऱ्हाणनगरच्या भगत परिवाराकडे आहे. श्री क्षेत्र तुळजापूर येथे विजयादशमीला तुळजाभवानी देवीचे सीमोल्लंघन नगरहून गेलेल्या याच पालखीमधून दरवर्षी होत असते. आज तिसऱ्या माळेच्या उत्सवाला संपूर्ण राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक बुऱ्हाणनगर येथे आले आहेत. सर्व भाविकांची मनोकामना पूर्ण करणारी ही देवी असल्याने भाविकांची मोठी श्रद्धा देवीवर आहे. देवीच्या आशीर्वादाने सर्वत्र मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे.

कुणाल भगत, अंजली भगत, कविता भगत, किरण भगत, मनीषा भगत, सुभाष भगत, सुनंदा भगत, ऋषिकेश भगत, ॲड. संकेत भगत , अजिंक्य भगत, वैभवी भगत, अंकिता भगत, ॲड.संकेत भगत, ॲड.रोहन भगत, अक्षदा, शिवानी भगत,वेद , वेदिका व क्षताक्षि भगत , मनीषा केदारी,अंबिका साळुंके उपस्थित होते.

## दुष्काळाच्या झळांत होरपळणाऱ्या जनतेच्या सुख-समृद्धीसाठी मोहटादेवीच्या चरणी प्रार्थना

**निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांचे सहकुटुंब दर्शन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** श्रद्धा, भक्ती आणि जनसेवेच्या भावनेतून अहिल्यानगरचे निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी सहकुटुंब श्रीक्षेत्र मोहटागड येथे जाऊन आई मोहटादेवीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी देवीच्या चरणी नतमस्तक होत सर्वसामान्य जनतेच्या सुख-समृद्धीसह जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना सुखाचे दिवस लाभावेत, अशी प्रार्थना केल्याचे निदर्शनात आले.

सध्या दुष्काळाच्या सावटामुळे अनेक भागांतील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना पाणीटंचाई, शेतीची चिंता आणि आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत आई मोहटादेवीच्या चरणी व्यक्त होणारी श्रद्धा ही केवळ धार्मिक भावना न राहता संकटांशी सामना करण्याचे बळ देणारी आशेची ज्योत ठरते. शेतकऱ्यांच्या शिवारात पुन्हा हिरवाई नांदावी, विहिरी आणि तलाव पाण्याने तुडुंब भरावेत, जनावरांना चारा-पाणी मिळावे आणि प्रत्येक कुटुंबाच्या आयुष्यात आनंदाचे दिवस यावेत, हीच भावना अशा दर्शनामागे असल्याचे महत्त्व अधोरेखित होते.

दादासाहेब गिते यांनी सहकुटुंब घेतलेल्या या दर्शनामुळे प्रशासकीय जबाबदारी सांभाळताना समाजाच्या सुख-दुःखाशी जोडलेली संवेदनशीलता आणि श्रद्धेचे महत्त्वही प्रकर्षाने जाणवते. संकटाच्या काळात जनतेच्या मनात आशा निर्माण करणारी आणि एकजुटीची भावना दृढ करणारी ही श्रद्धा समाजाला नवी ऊर्जा देते.

पाऊस पडो, शिवार फुलो आणि बळीराजाच्या चेहऱ्यावर पुन्हा समाधान फुलो, हीच आर्त भावना आई मोहटादेवीच्या चरणी व्यक्त होत असून, दुष्काळमुक्त आणि समृद्ध अहिल्यानगरची अपेक्षा जनतेच्या मनात पुन्हा एकदा जागवणारा हा भक्तिमय प्रसंग पाह्येला मिळाला.

## जनसंपर्कातून यशस्वी व्यवसायाची भरारी; आयकॉन स्टीलचे डीलर रामेश्वर भापकर यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** व्यवसायात गुणवत्ता, विश्वास आणि ग्राहकांशी जिव्हाळ्याचे संबंध यांना महत्त्व देत यशस्वी वाटचाल करणारे आयकॉन स्टीलचे डीलर रामेश्वर भापकर यांनी आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण केली आहे. जनसंपर्काच्या बळावर व्यवसायाची प्रगती साधत त्यांनी ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.

बांधकाम क्षेत्रात स्टीलला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या क्षेत्रात ग्राहकांना दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देणे, त्यांच्या गरजा समजून घेणे आणि योग्य मार्गदर्शन करणे या बाबींवर भापकर भर देतात. ग्राहकांशी पारदर्शक व्यवहार, वेळेवर सेवा आणि विश्वासार्हता ही त्यांच्या व्यवसायाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. व्यवसाय करताना केवळ आर्थिक नफा न पाहता ग्राहकांचे समाधान आणि दीर्घकालीन संबंध जपण्याला ते प्राधान्य देतात. बांधकाम क्षेत्रातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन ग्राहकांना योग्य उत्पादनांची माहिती देणे, तसेच त्यांच्या अपेक्षांनुसार सेवा देणे, यामुळे त्यांना व्यावसायिक क्षेत्रात चांगली प्रतिष्ठा मिळाली आहे.

जनसंपर्क हे व्यवसायवृद्धीचे प्रभावी माध्यम असल्याचे भापकर यांच्या वाटचालीतून दिसून येते. ग्राहक, बांधकाम व्यावसायिक आणि संबंधित घटकांशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवून त्यांनी व्यवसायाचा पाया मजबूत केला आहे. प्रामाणिकपणा, मेहनत आणि ग्राहककेंद्री दृष्टिकोन यांच्या जोरावर त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आजच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत गुणवत्तापूर्ण सेवा आणि विश्वासार्ह व्यवहार यांच्या माध्यमातून व्यवसायात यश मिळवता येते, हे रामेश्वर भापकर यांच्या कार्यातून अधोरेखित होते. त्यांच्या या व्यावसायिक वाटचालीमुळे उद्योजकतेची प्रेरणा मिळत असून, अहिल्यानगरच्या बांधकाम क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय ठरत असल्याने त्यांना सन्मानित करण्यात येत आहेत.

## गोदापात्रातील वाळू तस्करीवर पोलिसांचा बडगा; दोन मोटारसायकली ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरातील कॉलेजच्या पाठीमागील गोदापात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून मोठ्या प्रमाणात वाळूचा साठा जमा केला जात असल्याची माहिती समोर आली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास एक ब्रास वाहनातून वाळूची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळत असतानाच, पैठण पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीच्या प्रकरणात दोन मोटारसायकली ताब्यात घेतल्याची माहिती आहे. या वाहनांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, एक ब्रास वाळूची वाहतूक करणाऱ्या चारचाकी वाहनावरही कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार अनिल गायकवाड आणि पोलीस नाईक विलास सुखधान यांनी ही कारवाई केली. पोलिसांनी दोन मोटारसायकली ताब्यात घेतल्याने अवैध वाळू वाहतुकीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

**दोन मोटारसायकली ताब्यात; चारचाकी वाहनावर कारवाई कधी?**

कॉलेजच्या पाठीमागील गोदापात्रातून वाळूचा साठा जमा केला जात असल्याची माहिती समोर येत असून, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत वाळूची वाहतूक केली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याच परिसरात एक ब्रास वाळूची वाहतूक करणारी चारचाकी गाडीही असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे केवळ मोटारसायकलींवर कारवाई करून चालणार नाही, तर वाळूची वाहतूक करणाऱ्या चारचाकी वाहनाचीही तपासणी करून नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**वाळूचा साठा कोणाचा? प्रशासनासमोर सवाल**

गोदापात्रातून वाळूचा अवैध उपसा होत असेल, तर जमा केलेला साठा नेमका कोणाचा आहे? वाळू कुठे नेली जात आहे? तसेच या वाहतुकीमागे आणखी कोण सहभागी आहे? या बाबींची चौकशी होण्याची गरज आहे. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या मोटारसायकलींच्या प्रकरणात तपासातून काय निष्पन्न होते, याकडेही नागरिकांचे लक्ष लागले आहे.

महसूल विभागानेही लक्ष घालावे अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनासोबत महसूल विभागानेही संयुक्तपणे कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. गोदापात्राची प्रत्यक्ष पाहणी करून वाळूच्या साठ्याची तपासणी करावी, तसेच एक ब्रास वाळू वाहून नेणाऱ्या चारचाकी वाहनाची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दोन मोटारसायकली ताब्यात घेतल्यानंतर आता चारचाकी वाहनावरही कारवाई होते का, तसेच गोदापात्रातील वाळूच्या साठ्याबाबत प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे पैठणकरांचे लक्ष लागले आहे.

## या नवरात्रीत उपवास करत आहात? चला, प्रत्येक घास पौष्टिक बनवूया!

**वोक्हार्ट हॉस्पिटल्सतर्फे श्रद्धा, पोषण आणि योग्य आहार यांचा समतोल राखून उपवास करण्यासाठी मार्गदर्शन । डाएटिशियन स्वाती अवस्थी, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर**

नवरात्री हा भक्ती, उत्सव आणि आत्मचिंतनाचा सण आहे. अनेकांसाठी या नऊ दिवसांत उपवास करणे हा सणाचा महत्त्वाचा भाग असतो. मात्र, उपवास म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर साबुदाणा खिचडी, तळलेले बटाटे, उपवासाचे नमकीन आणि मिठाई असे पदार्थ येतात. हे पदार्थ पारंपरिक असले, तरी उपवासात रोज तेच पदार्थ खाणे किंवा दिवसभर तळलेल्या पदार्थांवर अवलंबून राहणे गरजेचे नाही.

या नवरात्रीत उपवासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. उपवासात काय खाऊ शकतो, याचा विचार करण्याऐवजी आपण स्वतःला एक महत्त्वाचा प्रश्न विचारू शकतो: आपल्या परंपरा जपत शरीराला आवश्यक पोषण कसे देता येईल?

उपवास हा आपल्या खाण्याच्या सवयींकडे अधिक लक्ष देण्याची, साधा आहार घेण्याची आणि विचारपूर्वक पदार्थ निवडण्याची एक चांगली संधी आहे. थोडे नियोजन केल्यास उपवासात वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक पदार्थांपासून चविष्ट, पोटभर आणि पौष्टिक आहार तयार करता येतो.

**पारंपरिक पदार्थ, पण आहाराची योग्य निवड**

राजगिरा, कुट्टू (बकव्हीट), शिंगाड्याचे पीठ, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, सुका मेवा, बिया, फळे आणि उपवासात चालणाऱ्या भाज्या यांचा वापर करून अनेक प्रकारचे पौष्टिक पदार्थ तयार करता येतात. यासाठी हे पदार्थ योग्य प्रमाणात एकत्र करून योग्य पद्धतीने बनवणे महत्त्वाचे आहे.

उदाहरणार्थ, राजगिऱ्यापासून पोळ्या किंवा लापशी तयार करता येते. कुट्टूच्या पिठाच्या पुऱ्या तळण्याऐवजी कमी तेलात पोळी करता येते. दही, पनीर आणि दूध यांमधून प्रथिने मिळतात. सुका मेवा आणि बियांमधून शरीराला चांगले स्निग्ध पदार्थ मिळतात आणि पोट जास्त वेळ भरलेले राहण्यास मदत होते. ताजी फळे आणि उपवासात चालणाऱ्या भाज्यांमुळे आहारात तंतुमय पदार्थ (फायबर), जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा समावेश होतो. तसेच जेवण अधिक रंगतदार आणि पौष्टिक होते. पारंपरिक पदार्थ पूर्णपणे सोडून देणे हा यामागचा उद्देश नाही, तर आपल्या खाद्यपरंपरा जपत आहाराची योग्य निवड करणे हा त्यामागचा मुख्य हेतू आहे.

उपवास अधिक आरोग्यदायी करण्याचे सहा सोपे मार्ग

**१. पदार्थ बनवण्याची योग्य पद्धत निवडा**

उपवासात चालणारे पदार्थ म्हणजे ते नेहमीच आरोग्यदायी असतात, असे नाही. उपवासात तळलेले पदार्थ खाण्याची परवानगी असली, तरी ते वारंवार खाल्ल्याने पोट जड होऊ शकते. त्यामुळे पदार्थ उकडून, वाफवून, भाजून किंवा कमी तेलात परतून खाण्याला प्राधान्य द्या. उदाहरणार्थ, वारंवार तळलेले बटाट्याचे पदार्थ खाण्याऐवजी दह्यासोबत उकडलेले बटाटे खाणे हा एक चांगला पर्याय आहे.



**२. आहारात वेगवेगळ्या पदार्थांचा समावेश करा**

साबुदाणा आणि बटाटे यांमध्ये कर्बोदके जास्त असतात. त्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. मात्र, केवळ या पदार्थांपासून बनवलेले पदार्थ खाल्ल्याने प्रत्येकाचे पोट जास्त वेळ भरलेले राहीलच असे नाही. आपल्या आहाराच्या गरजा आणि उपवासाच्या पद्धतीनुसार त्यासोबत दही, दूध, पनीर, सुका मेवा किंवा बिया यांचा समावेश करा. अशा प्रकारे आहारात वेगवेगळ्या पदार्थांचा समावेश केल्याने शरीराला ऊर्जा मिळण्यास आणि भूक नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.

**३. आहारात ताजी फळे आणि भाज्या समाविष्ट करा**

फळे आणि उपवासात चालणाऱ्या भाज्यांमुळे आहारात विविधता येते. आपल्या आवडीनुसार आणि परंपरेनुसार सफरचंद, केळी, पपई, काकडी आणि इतर योग्य फळे व भाज्यांचा आहारात समावेश करा. यांमधून शरीराला तंतुमय पदार्थ (फायबर), जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतात. तसेच, जेवण अधिक ताजेतवाने आणि रुचकर होते.

**४. दिवसभर पुरेसे पाणी प्या**

उपवासात शरीरातील पाण्याचे प्रमाण योग्य राखणे खूप महत्त्वाचे आहे. उपवासात पाणी पिण्याची परवानगी असल्यास दिवसभर नियमितपणे पाणी प्या. नारळपाणी आणि साखर न घातलेले लिंबूपाणी हेही अनेकांसाठी चांगले पर्याय ठरू शकतात. साखरयुक्त पेये जास्त प्रमाणात पिणे टाळा. हवामान, शारीरिक हालचाली आणि व्यक्तीच्या आरोग्यानुसार शरीराला लागणाऱ्या पाण्याचे प्रमाण बदलू शकते.

५. किती खात आहोत, याकडे लक्ष द्या

उपवासाच्या नावाखाली उपवासाचे नमकीन, चिप्स, मिठाई किंवा तळलेले पदार्थ भरपूर प्रमाणात खाणे टाळा. उपवासात चालणारे पदार्थ असले, तरी ते किती प्रमाणात खाल्ले जातात आणि कशा पद्धतीने बनवले जातात, हे महत्त्वाचे आहे. हळूहळू खा आणि भूक किती आहे, तसेच पोट भरले आहे का, याकडे लक्ष द्या. नेहमीपेक्षा कमी वेळा जेवण होत असल्यामुळे सतत काही ना काही खात राहणे टाळा.

**६. शरीराचे संकेत ओळखा**

उपवास करताना सतत अशक्तपणा जाणवणे, चक्कर येणे, डोके दुखणे किंवा नेहमीपेक्षा जास्त थकवा जाणवणे या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका. गरज असल्यास विश्रांती घ्या. ही लक्षणे कायम राहिल्यास किंवा तीव्र झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. उपवास म्हणजे शरीराची सहनशक्ती तपासण्याची परीक्षा नाही.

**उपवास करताना अधिक काळजी घेणे आवश्यक**

योग्य नियोजन केल्यास अनेक निरोगी प्रौढ व्यक्ती उपवास करू शकतात. मात्र, प्रत्येकासाठी उपवासाची पद्धत सारखी योग्य असेलच असे नाही. मधुमेह किंवा किडनीचा आजार असलेल्या व्यक्ती, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नियमित औषधे घेणाऱ्या व्यक्तींनी आहाराबाबत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

जेवणाच्या वेळेत आणि आहारात बदल केल्याने रक्तातील साखरेची पातळी, शरीरातील पाण्याचे प्रमाण आणि औषधांची गरज यावर परिणाम होऊ शकतो. तुम्हाला आधीपासून काही आजार असल्यास उपवास करण्यापूर्वी डॉक्टर किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्या. तसेच, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय सुरू असलेल्या औषधांमध्ये कोणताही बदल करू नका.

**या नवरात्रीत उपवासाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहूया**

उपवास म्हणजे कमी खाणे, आवडीचे पदार्थ न खाता राहणे किंवा मोजकेच पदार्थ खाऊन दिवस काढणे, असे असण्याची गरज नाही. उपवास ही आपल्या दैनंदिन खाण्याच्या सवयींकडे लक्ष देण्याची, घाईघाईने किंवा विचार न करता खाणे टाळण्याची आणि आहाराबाबत अधिक जागरूक होण्याची संधी आहे. पारंपरिक पदार्थांचा योग्य वापर करून, पदार्थ बनवण्याच्या आरोग्यदायी पद्धती निवडून आणि शरीराच्या गरजा लक्षात घेऊन आपण आपल्या आरोग्याची काळजी घेत नवरात्री साजरी करू शकतो.

या सणाच्या काळात उपवास म्हणजे केवळ खाण्यापिण्यावरील बंधने, असा विचार न करता त्यातून आहारात समतोल राखणे, आरोग्याबाबत जागरूक राहणे आणि शरीराला योग्य पोषण देणे यांना प्रोत्साहन मिळू द्या. यासोबतच आपली श्रद्धा आणि भक्तीही जपूया.

श्रद्धेने उपवास करा. जाणीवपूर्वक आहार घ्या. संतुलित पद्धतीने सण साजरा करा.

कारण उपवास करताना योग्य काळजी घेणे आणि विचारपूर्वक आहार घेणे महत्त्वाचे आहे. आपण किती कमी खाऊ शकतो, हे तपासण्याऐवजी शरीराला योग्य पोषण कसे देता येईल, याकडे लक्ष देण्याची ही एक संधी आहे.

वोक्हार्ट हॉस्पिटल्सतर्फे सर्वांना निरोगी, आनंदी आणि मंगलमय नवरात्रीच्या शुभेच्छा!

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरच्या हुंडेकरी अकॅडमीचे दोन खेळाडू महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात निवड



अहिल्यानगर - शहरातील हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रतिभावान क्रिकेटपटू किरण चोरमले आणि अश्कान काझी यांची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या () वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कर्नल सी. के. नायडू ट्रॉफी २०२६-२७ स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या २३ वर्षांखालील क्रिकेट संघात निवड झाली आहे. या निवडीने क्रिकेट क्षेत्रात अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.  या निवडीमध्ये विशेष अभिमानाची बाब म्हणजे किरण चोरमले याच्यावर महाराष्ट्राच्या २३ वर्षांखालील संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दोन्ही खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या जोरावर आपली गुणवत्ता सिध्द केली आहे. किरण चोरमले हा उजव्या हाताचा मधल्या फळीतील फलंदाज असून तो उजव्या हाताने फिरकी गोलंदाजीही करतो. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही क्षेत्रांतील कौशल्याच्या जोरावर त्याने क्रिकेटमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विशेष म्हणजे, किरणने यापूर्वी महाराष्ट्राच्या १४, १६, १९ आणि २३ वर्षांखालील विविध वयोगटांतील संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. सातत्यपूर्ण कामगिरी, खेळातील शिस्त, नेतृत्वगुण आणि अनुभवाच्या बळावर त्याने महाराष्ट्राच्या युवा क्रिकेटमध्ये महत्त्वाचे स्थान मिळविले आहे. किरणच्या क्रिकेट कारकिर्दीतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे त्याने यापूर्वी महाराष्ट्राच्या १९ वर्षांखालील संघाचे कर्णधारपद भूषविले आहे. तसेच, आशिया कप स्पर्धेत भारतीय १९ वर्षांखालील संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधीही त्याला मिळाली होती. १९ वर्षांखालील विश्वचषकासाठी भारतीय संघाच्या राखीव खेळाडूंमध्येही त्याचा समावेश झाला होता. आता महाराष्ट्राच्या २३ वर्षांखालील संघाचे नेतृत्व करण्याची संधी त्याला प्राप्त झाली आहे. दरम्यान, अश्कान काझी याचीही महाराष्ट्राच्या २३ वर्षांखालील संघात निवड झाल्याने अहिल्यानगरच्या क्रिकेट क्षेत्राला आणखी एक यश मिळाले आहे. अश्कान हा डावखुरा मधल्या फळीतील फलंदाज असून त्यानेही महाराष्ट्राच्या १४, १६, १९ आणि २३ वर्षांखालील संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. विविध वयोगटांतील क्रिकेट स्पर्धांमधून मिळालेला अनुभव आणि सरावातील सातत्य यांच्या बळावर त्याने ही महत्त्वपूर्ण संधी मिळविली आहे. राज्याच्या युवा संघात एकाच अकॅडमीतील दोन खेळाडूंची निवड होणे, ही संबंधित अकॅडमीसह जिल्ह्याच्या क्रिकेट क्षेत्रासाठी गौरवाची बाब मानली जात आहे.

### ख्रिस्तवाणीचे राज्यस्तरीय कविसंमेलन अकोल्यात - डॉ. अनुपमा उजगरे



अहिल्यानगर- ख्रिस्तवाणी शब्दगाणी समूहाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध, राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. मानवता प्रतिष्ठानाच्या पुढाकाराने ख्रिस्तवाणी शब्दगाणी समुह व दयासागर सामाजिक आरोग्य व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला येथे दिनांक ७ व ८ नोव्हेंबर २०२६ दरम्यान संपन्न होणाऱ्या दोन दिवशीय राज्यस्तरीय ख्रिस्ती कविसंमेलनात मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.  यावेळी ठाणे येथील सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ अनुपमा उजगरे यांना पंडिता रमाबाई गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच अन्य पुरस्कार पुढीलप्रमाणे देण्याचे ठरले आहे. मानवता साहित्य गौरव पुरस्कार सौ मंगला वागळे, बारामती, मानवता सामाजिक कार्य गौरव पुरस्कार, अहिल्या नगर येथील सुप्रसिद्ध कवयित्री आणि सामाजिक कार्यकर्त्या सरोज आल्हाट यांना देण्याचे ठरले आहे. तसेच पुणे येथील आचार्य जयप्रकाश आढाव यांना मानवता सांस्कृतिक कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. शेवगाव येथील कवयित्री सौ आशाताई घुटे यांना मानवता शिक्षक गौरव पुरस्कार, पुणे येथील संगीतकार दिलीप क्षीरसागर यांना मानवता संगीत गौरव त्याचप्रमाणे सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या दौंड येथील कार्यकर्त्या सौ संगिता घोडके यांना मानवता सेवाव्रती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.  नागपूर येथील सुप्रसिद्ध साहित्यिक आचार्य नितीन सरदार हे संमेलनाचे अध्यक्षस्थान भुषविणार आहेत .

## सुपा एमआयडीसीतून पारनेर शहरास पाणी मिळणेसाठी आमदार दातेंची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पारनेर नगरपंचायत आणि नवनागापूर ग्रामपंचायतीला सुपा एमआयडीसीमधून पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह यांची मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली. या दोन्ही मागण्यांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले.

या प्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक तथा पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रशांत गायकवाड उपस्थित होते. पारनेर नगरपंचायतीच्या सर्व नगरसेवकांनी काल आमदार दाते सर यांची भेट घेऊन सुपा एमआयडीसीमधून शहरासाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या मागणीची तातडीने दखल घेत आमदार दाते सर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याची मागणी केली.

दरम्यान, नवनागापूर ग्रामपंचायतीसाठी दररोज १,९०० घनमीटर पाणी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील प्रस्ताव ग्रामपंचायतीने यापूर्वीच सादर केला आहे. या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. पारनेर नगरपंचायतीनेही पाणी उपलब्धतेसाठी आवश्यक प्रस्ताव लवकरात लवकर तयार करून संबंधित प्रादेशिक अधिकाऱ्यांकडे सादर करावा, जेणेकरून पुढील प्रशासकीय प्रक्रिया गतिमान होऊन निर्णय घेण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा आहे. आमदार दाते सर यांनी नगरसेवकांच्या मागणीची तातडीने दखल घेत वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केल्याने दोन्ही ठिकाणच्या पाणीप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. आता प्रस्तावांवरील पुढील कार्यवाही आणि प्रत्यक्ष पाणी उपलब्धतेबाबत होणाऱ्या निर्णयाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## खास नवरात्री उत्सवानिमित्य रिल्स व निबंध स्पर्धा

**विषय – 'देवीची पूजा फक्त मंदिरात नको, लेकीचा सन्मान प्रत्येक घरात हवा'**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगरच्या वतीने खास नवरात्र उत्सवानिमित्त रिल व निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. बेटी बचाओ समितीच्या प्रमुख डॉ. सुधा कांकरिया यांच्या पुढाकाराने होणार्या स्पर्धेचा विषय 'देवीची पूजा फक्त मंदिरात नको, लेकीचा सन्मान प्रत्येक घरात हवा.' तरी जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा अशी माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष रो सुहास क्षीरसागर यांनी दिली.

सदर निबंध स्पर्धेला वयाचे किंवा शब्दांचे बंधन नसुन मराठी किंवा हिंदी भाषेत ती सादर करता येईल. तसेच रिल्सच्या विषयही तोच असुन जास्तीत जास्त १ मिनीटाची रिल हिंदी किंवा मराठी भाषेत असावी. अशी माहिती रोटरीचे सचिव रो संदिप ठोंबे यांनी दिली. सदर निबंध स्पर्धा डॉ. सुधा कांकरिया साई सूर्य नेत्रसेवा, माणिक चौक, अहिल्यानगर या पत्यावर प्रत्यक्षरूपाने /पोस्टाने तसेच रिल्स ९८५०८८७८३८ या नंबरवर दिनांक २० ऑक्टोबर पुर्वी पोहचवावी असे संयोजक कळवतात.

नवरात्र उत्सव एक नारीशक्ती जयघोष करणारा उत्सव आहे. आदीशक्तीची पुजा तसेच अनेक व्रत–यज्ञ–जप–तप ने केली जाते. या निमित्ताने शक्तीचे जागरण व्हावे असा हेतु असतो. परंतू एकीकडे मंदिरात देवीची पुजा केली जाते व दुसरीकडे मात्र गर्भातच तिला मारून टाकले जाते. हा विरोधाभास थांबावा, प्रत्येक घरोघरी स्त्री जन्माचे स्वागत व्हावे, तिचा सन्मान व्हावा, समाजाची विस्कटलेली घडी परत नीट बसावी यासाठी समाजाचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे व त्यासाठी सदर स्पर्धेचे आयोजन फक्त अहिल्यानगर मध्येच नाही तर महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्यातुन घेण्यात येत आहे. यासाठी रोटरीचे प्रांतपाल रो जयेशभाई पटेल व रो पारूल भाभी पटेल यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे असे स्त्रीजन्माचे स्वागत करा चळवळीच्या आद्यप्रवर्तक व सदर प्रोजेक्टच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया यांनी सांगितले.

## दिवाळीपूर्वी थकीत वेतन फरक द्या; पेन्शनर्सचे महापालिका प्रवेशद्वारात धरणे आंदोलन!

**५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर । पाचव्या वेतन आयोगाचा फरक, सहाव्या आयोगाचे आठ हप्ते आणि नियमित पेन्शनसाठी एल्गार**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवाळीचा सण तोंडावर आला असताना अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने मंगळवारी (दि. १३ ऑक्टोबर) महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन करण्यात आले. पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते आणि दरमहा वेळेवर पेन्शन मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून आपली व्यथा मांडली. दिवाळीपूर्वी थकीत रक्कम अदा करून पेन्शनधारकांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यावेळी उपाध्यक्ष वसंत थोरात, मिलिंद वैद्य, कार्याध्यक्ष डी. यू. देशमुख, रंगनाथ गावडे, संजीव परशरामी, मधुकर खताळ, शेखर वैद्य, अन्वर शेख, मुस्ताक शेख, अनिस खान, सतीश वाघ, मंजूर शेख, गुरु टेपाळे, ज्ञानेश्वर धिरडे, दिलीप पाठक, नंदू डापसे, राजेंद्र सस्कर, रवी भारताळ, सुधाकर काशिद, हिरामन जाधव, आर.बी. कदम, गोरक्षनाथ तेलोरे, ठोकळ, अरुण घोडबंदर, प्रमोद मुळे, मुलानी, राजेंद्र बेंद्रे, सौ. रंजना भोसले, लता महाले, मिरा चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान मनपा कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सतीश साठे यांनी या आंदोलनास पाठिंबा दिला.

महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वेतन आयोगाच्या थकीत रकमेचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याचे संघटनेने यावेळी निदर्शनास आणून दिले. संघटनेच्या म्हणण्यानुसार, न्यायालयीन निर्णयानुसार महापालिकेतील ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचा फरक मिळणे अपेक्षित आहे. मात्र, ही रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्याचप्रमाणे सहाव्या वेतन आयोगाचे आठही हप्ते अद्याप प्रलंबित असून, या हप्त्यांची एकूण रक्कम अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये असल्याचे संघटनेने सांगितले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळात महापालिकेच्या कामकाजासाठी योगदान दिले आहे. त्यामुळे नियमानुसार आणि न्यायालयीन निर्णयानुसार देय असलेली रक्कम मिळण्यासाठी त्यांना वारंवार आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, अशी भूमिका संघटनेने मांडली.

दिवाळीसारखा महत्त्वाचा सण जवळ आला असताना घरखर्च, किराणा, औषधोपचार आणि इतर आवश्यक खर्चांची व्यवस्था करण्यासाठी अनेक पेन्शनधारकांना आर्थिक नियोजन करावे लागत आहे. अशा परिस्थितीत हक्काची थकीत रक्कम वेळेत मिळाली, तर ज्येष्ठ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोठा आधार मिळू शकतो. त्यामुळे प्रशासनाने या मागण्यांकडे केवळ प्रलंबित आर्थिक बाब म्हणून न पाहता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या जगण्याशी निगडित प्रश्न म्हणून लक्ष द्यावे, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियमित पेन्शन वेळेवर मिळत नसल्याचा मुद्दाही आंदोलनादरम्यान उपस्थित करण्यात आला. पेन्शन ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार असते. वयोमानानुसार औषधोपचार, आरोग्यविषयक खर्च, घरखर्च आणि दैनंदिन गरजांसाठी त्यांना नियमित पैशांची आवश्यकता असते. मात्र, पेन्शन मिळण्यास विलंब झाल्यास त्यांचे संपूर्ण आर्थिक नियोजन विस्कळीत होते. त्यामुळे प्रत्येक महिन्याची पेन्शन त्या महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली.

## कॉ.भागवत वादविवाद स्पर्धेत न्यू आर्टस्, पारनेरला विजेतेपद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कॉम्रेड एकनाथराव भागवत यांच्या स्मृतिनिमित्त न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त), अहिल्यानगर मध्ये ६ व ७ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय वाद विवाद व वक्तृत्व स्पर्धेमध्ये आकाश मोहिते व महेश उशीर, न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर कॉलेजच्या संघाने वाद विवाद स्पर्धेमध्ये प्रथम व वक्तृत्व स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला.

तुलसी काळे व सिद्धी बाफना, जिजामाता महाविद्यालय, भेंडा यांनी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक तर संपदा लांडगे व दिग्विजय येवले, न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर यांनी वाद विवाद स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. वाद विवाद स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक प्रथमेश गिरी व वैभव बंगाळे, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी पटकावला. तर याच महाविद्यालयाच्या कार्तिकी कराड व साक्षी मुंढे यांनी वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. वाद विवाद स्पर्धेमध्ये चतुर्थ क्रमांक तनिष्क साळवी व सानवी लिखे, रेसिडेन्सीअल ज्यू. कॉलेज, अहिल्यानगर तर वक्तृत्व स्पर्धेतील चतुर्थ क्रमांक शेख इरफान व दीपिका सावंत, मालपाणी लॉ कॉलेज, संगमनेर यांनी पटकावला. निखील बोडखे, न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव आणि शेख इरफान, मालपाणी लॉ कॉलेज, संगमनेर यांना वादविवाद स्पर्धेसाठी उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

अक्षदा भराट, ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा व ऋतुजा गावडे यांना वक्तृत्व स्पर्धेसाठी उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. तनिष्क साळवी व सानवी लिखे या रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेजच्या संघाने ज्युनिअर कॉलेज गटातील वादविवाद स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. पारितोषिक वितरणाच्या समारोप समारंभासाठी सौदाळा गावाचे सरपंच शरद आरगडे हे प्रमुख पाहुणे तर अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी सौदाळा गावात राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये देशातील पहिली जातमुक्त ग्रामपंचायत, शिवी दिल्यास ५०० दंड करणारी राज्यातील पहिली ग्रामपंचायत, वृद्ध व अनाथ दांपत्यास जेवणाची व्यवस्था, ५ रू मध्ये २० लिटर थंड व शुद्ध पाणी अशा अनेक उपक्रमांची त्यांनी माहिती दिली. या स्पर्धेसाठी प्रा.डॉ. गजानन चव्हाण, सहयोगी प्राध्यापक, वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, फुंदे, रायगड व ऋतुजा म्हात्रे, महामुनी, मॉडर्न स्कूल अॅण्ड ज्युनियर कॉलेज, वाशी, नवी मुंबई यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दारेसाहेब आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे स्पर्धक विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संखेने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. मनीषा तोडकरी यांनी केले आणि प्रा.नागेश शेळके यांनी आभार व्यक्त केले.

## कधीही न निघालेले जहाज: मांडूच्या तरंगत्या राजवाड्याचे वास्तुकौशल्य

**लेखक: अर्णव अमोल दारवेकर**
**विशेष लेख: वारसा आणि वास्तुरचना**

मांडू, मध्य प्रदेश  राजस्थानचे प्रसिद्ध किल्ले आणि आग्र्याच्या संगमरवरी घुमटांच्या गर्दीपासून दूर, विंध्य पर्वतरांगांच्या उंचावर १५ व्या शतकातील आनंदाचे शहर (  ) वसलेले आहे. एकेकाळी माळवा सुलतानशाहीची राजधानी असलेल्या या मांडू शहरात, भारतातील प्राचीन जल-अभियांत्रिकी (–) आणि वास्तुकलेचा एक अत्यंत उत्कृष्ट पण दुर्लक्षित नमुना उभा आहे: जहाज महाल.

मांडूचा इतिहास बहुतांश वेळा बाज बहादूर आणि राणी रूपमती यांच्या प्रेमकहाण्यांभोवती फिरत असला तरी, या पठारी शहराचे खरे आश्चर्य त्यांच्या द्रव गतिकी ( ) आणि शाश्वत जल व्यवस्थापनावरील प्रभुत्वात दडलेले आहे.

तरंगत असल्याचा भास

१५ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुलतान गियास–उद्–दीन खिलजी याने बांधलेला जहाज महाल, हे कल्पक भौमितिक रचनेचे एक उत्तम उदाहरण आहे. १२० मीटर लांब आणि अरुंद असलेली ही वास्तू कपूर तलाव आणि मुंज तलाव या दोन कृत्रिम तलावांच्या बरोबर मध्ये वसलेली आहे. जेव्हा पावसाळ्यात हे तलाव काठोकाठ भरतात, तेव्हा राजवाड्याचा पाया अदृश्य झाल्यासारखा वाटतो. संथ पाण्यावर पडणाऱ्या या लांबलचक वास्तूच्या सावलीमुळे, एखाद्या विशाल समुद्रात मोठे जहाज शांतपणे तरंगत असल्याचा अद्भुत दृष्टिभ्रम ( ) निर्माण होतो.



परंतु जहाज महालाचे कसब केवळ दृश्यात्मक सौंदर्यापुरते मर्यादित नाही. हा प्राचीन उष्मागतिकीचा () एक उत्कृष्ट नमुना आहे. दोन्ही तलावांवरून वाहणाऱ्या सततच्या वाऱ्याचा उपयोग करून घेण्यासाठी या राजवाड्याची रचना करण्यात आली होती. इथले खुले मंडप, बाहेर आलेले झरोके आणि अचूक कमानी, पाण्यावरून येणाऱ्या थंड व दमट हवेला थेट आतल्या मार्गिकांमध्ये वळवतात. यामुळे मध्य भारतातील कडक उन्हाळ्यातही राजवाड्याचे आतील तापमान लक्षणीयरीत्या कमी राहते.

हा राजवाडा केवळ पाण्याशेजारी उभा नाही; तर त्याने अंतर्गत कालवे, तलाव आणि गाळण टाक्यांच्या गुंतागुंतीच्या जाळ्याद्वारे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाचा आपल्या मुख्य वास्तुरचनेत अत्यंत कुशलतेने समावेश केला आहे.

आधुनिक जगासाठी प्राचीन जल-अभियांत्रिकी

मांडू हे एका खडकाळ पठारावर वसलेले असून तिथे नैसर्गिक भूजल साठे जवळपास नाहीतच. एका गजबजलेल्या राजधानीला जिवंत ठेवण्यासाठी, माळव्याच्या वास्तुविशारदांना पूर्णपणे पावसाचे पाणी साठवणे आणि त्याचे व्यवस्थापन करण्यावर अवलंबून राहावे लागले.

त्यांनी बावडी (), भूमिगत साठवण टाक्या आणि पाणलोट क्षेत्रांचे एक विस्तीर्ण जाळे उभारले. मांडूमधील जल व्यवस्थापन प्रणाली गुरुत्वाकर्षणावर आधारित कालव्यांचा वापर करत असे, ज्यात पावसाचे पाणी वाळू आणि कोळशाच्या थरांमधून गाळून घेतले जाई. त्यानंतर बाष्पीभवन टाळण्यासाठी हे पाणी खोल, सावली असलेल्या विहिरींमध्ये साठवले जात असे.

पाण्याच्या प्रवाहाचा वेग मोजण्यासाठी, व्यवस्थापनासाठी आणि दोन महाकाय तलावांच्या पाण्याच्या दाबामुळे वास्तूचे नुकसान होऊ नये यासाठी आवश्यक असलेली अचूक भौमितिक रचना, मांडूला आधुनिक अभियंत्यांसाठी अभ्यासाचा एक रंजक विषय बनवते. येथील बांधकाम करणाऱ्यांना भार विभाजनाची ( ) सखोल व्यावहारिक जाण होती. त्यामुळेच मुसळधार पावसात जमीन पाण्याने संपृक्त झाल्यानंतरही राजवाड्याच्या भिंती न खचता भक्कम उभ्या राहू शकल्या.

भविष्यासाठी एक आदर्श आराखडा

आज जेव्हा आधुनिक भारतीय शहरे पाणीटंचाई, खालावत चाललेली भूजल पातळी आणि अर्बन हीट-आयलंड ( –) यांसारख्या समस्यांशी झगडत आहेत, तेव्हा मांडूचा हा वास्तू वारसा पूर्वीपेक्षा अधिक सुसंगत व महत्त्वाचा ठरतो. जहाज महाल हा केवळ गतकाळातील सुलतानशाहीचा अवशेष नाही, तर तो शाश्वत नागरी रचनेचा एक जिवंत आराखडा आहे. आपले पूर्वज स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा योग्य वापर कसा करत असत, नैसर्गिक वायुवीजनाचा () पुरेपूर उपयोग कसा करत असत आणि पाण्याच्या मूलभूत गुणधर्मांचा आदर करून मजबूत वास्तू कशी उभारत असत, हे यातून दिसून येते. आधुनिक प्रवाशांसाठी आणि आजच्या नगररचनाकारांसाठी, वास्तुरचना आणि पर्यावरणीय कार्यप्रणाली एका परिपूर्ण, शाश्वत सुसंवादात कशी एकत्र येऊ शकतात, याचे मांडू हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

# दीर्घकालीन भांडवली नफा करमुक्त व्हावा : राजेश देशपांडे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सद्यस्थितीत शेअर्स व म्युच्युअल फंडातील दीर्घकालीन भांडवली नफा करमुक्त करण्याची हीच योग्य वेळ आहे, अशी मागणी देशभरातील गुंतवणूक सल्लागारांनी नुकत्याच पणजी येथील व्यवसायात परिषदेत केली असल्याचे अहिल्यानगरचे अर्थ व गुंतवणूकतज्ज्ञ राजेश देशपांडे यांनी सांगितले. या परिषदेत पंतप्रधान आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष महेंद्र देव तसेच कोटक एएमसीचे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ नीलेश शहा तसेच अनेक वित्तीय व्यवस्थापक उपस्थित होते.

मागील दोन वर्षांपासून विदेशी गुंतवणूकदारांच्या जोरदार विक्रीतही भारतीय सामान्य गुंतवणूकदार मात्र भारतीय अर्थव्यवस्था, केंद्र सरकार व कॉर्पोरेट सेक्टरवरील विश्वास कायम ठेवून इक्विटी म्युच्युअल फंड, शेअर्समधील खरेदी सातत्याने करीत आहे. अस्थिर जागतिक परिस्थितीत वाढणाऱ्या महागाईतही हा गुंतवणूकदार प्रसंगी काटकसर करून आपल्या मुलांच्या व स्वतःच्या कुटुंबाच्या दीर्घकालीन उज्ज्वल भवितव्यासाठी भारतीय भांडवली बाजारात गुंतवणूक करीत आहे, अशी भूमिका या परिषदेत मांडण्यात आली.

या परिषदेमध्ये निरनिराळ्या तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केली. आखातातील तणाव, जागतिक स्थिती, अमेरिकेवरील कर्जाचे वाढते प्रमाण, कृत्रिम बुद्धिमत्तेचा भारतीय व्यवसायांवर होणारा परिणाम तसेच यावर्षीच्या अपुऱ्या पावसामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) भविष्यकाळातील संभाव्य उपाययोजना याबाबत चर्चा झाली.

### नामदार छगनराव भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त समता परिषदेतर्फे

# गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, महानगर अहिल्यानगर यांच्या वतीने महाराष्ट्राचे अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री नामदार छगनराव भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील हायस्कूल, येथे झालेल्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा सामाजिक संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, प्रदेश चिटणीस अनिल निकम, महानगर अध्यक्ष ब्रिजेश ताठे, कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे यांच्यासह माजी महापौर भगवानराव फुलसोंदर,संस्थेचे ज्ञानदेव पांडुळे ,गंगाधर लोंढे ,रामदास फुले ,केलास फुलसौंदर ,पंडित औसरकर,जालिंदर बोरुडे ,शामराव व्यवहारे ,शंकरराव आव्हाड ,अर्जुनराव बोरुडे ,भरत गारुडकर ,प्रशांत शिंदे ,मच्छिंद्र फुलसोंदर,शरद जाधव,रतन कानडे,देवेंद्र दुधाडे ,मंगेश खंगले आदींसह परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ओबीसी समाजबांधव उपस्थित होते.

यावेळी बोलताना अंबादास गारुडकर म्हणाले, ''शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे हा केवळ मदतीचा उपक्रम नसून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक आणि समतावादी विचारांचा वारसा पुढे नेत अशा सामाजिक उपक्रमांतून वंचित घटकांना बळ देण्याचे काम समता परिषद करत आहे,'' असे त्यांनी सांगितले.

समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना भगवानराव फुलसौंदर म्हणाले कि महात्मा फुले यांच्या समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना अभिप्रेत असलेले कार्य अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी समता परिषद भविष्यातही विविध सामाजिक उपक्रम राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले प्रास्ताविक ज्ञानदेव पांडुळे यांनी केले तर कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे यांनी समता परिषदेच्या कार्याची माहिती दिली आभार महानगर अध्यक्ष ब्रिजेश ताठे यांनी मानले

### गुंजाळे ग्रामस्थ आणि सहकारी शिक्षकांनी दिला हृद्य निरोप

# जि. प. शिक्षिका मोहिनी थिटे प्रदीर्घ सेवेतून निवृत्त



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–**अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या राहुरी तालुक्यातील गुंजाळे जि. प. शाळेतील अध्यापिका श्रीमती मोहिनी ज्ञानेश्वर थिटे – सातपुते या आपल्या प्रदीर्घ सेवेतून नुकत्याच निवृत्त झाल्या. त्यानिमित्त गुंजाळे ग्रामस्थ आणि शाळेतील सहकारी शिक्षकांच्या वतीने श्रीमती मोहिनी थिटे – सातपुते यांना सेवापूर्ती समारंभात हृद्य निरोप देण्यात आला. श्रीमती मोहिनी थिटे – सातपुते या गेली साडेतीन वर्षे गुंजाळे जिल्हा परिषद शाळेत कार्यरत होत्या. त्यापूर्वी त्यांनी घोडेगाव (नेवासा), गजानन वसाहत, बोल्हेगाव (नगर) आणि लेकुरवाळी आखाडा (नेवासा) येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले. त्यांचे अनेक विद्यार्थी आज चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांशी मिळून मिसळून शिकविण्याच्या पद्धतीमुळे त्या विद्यार्थ्यांमध्ये आवडत्या शिक्षिका म्हणून प्रिय राहिल्या. सेवापूर्तीनिमित गुंजाळे ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती आणि गुंजाळे जि. प. शाळेतील सहकारी शिक्षकांच्या वतीने आयोजित समारंभात श्रीमती मोहिनी थिटे – सातपुते यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना हृदय निरोप देण्यात आला. यावेळी सरपंच गंगूबाई नवले आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व तबाजी नवले पाटील यांच्या हस्ते शिक्षिका मोहिनी थिटे – सातपुते आणि ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातपुते यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी संजय बोबडे, केंद्रप्रमुख बाबा गोसावी, केंद्रप्रमुख वाकचौरे उपस्थित होते. सर्वच प्रमुख पाहुण्यांनी श्रीमती थिटे यांच्या सेवाकार्याचा आवर्जून गौरव केला. श्रीमती थिटे यांनी आपल्या मनोगतात गुंजाळे जिल्हा परिषद शाळेच्या प्रगतीसाठी गुंजाळे ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीचे मोठे योगदान असल्याचे सांगताना शाळेचे मुख्याध्यापक आणि सहकारी शिक्षकांबद्दल त्यांनी ऋणनिर्देश व्यक्त केले. या कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन किरण रासकरसर यांनी केले तर मुख्याध्यापिका शीतल शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत व आभार मानले.

# नंदनवन नगरातील विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त घटस्थापना

### विचार भारती संस्थेच्या वतीने भजन संध्या उत्साहात; देवीच्या गीतांनी परिसर भक्तिमय

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नंदनवन नगर येथील विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त भक्तिमय व मंगलमय वातावरणात देवीची स्थापना आणि घटस्थापना करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संपत बारस्कर आणि त्यांच्या पत्नी किरणताई बारस्कर यांच्या हस्ते विधिवत घटस्थापना करण्यात आली. यानिमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने आयोजित भजन संध्या कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गायक भूषण मालू यांच्या मधुर आवाजातील देवीच्या गीतांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. 'आंबे आंबे, उदो उदो'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. नंदनवन नगर येथील विठ्ठल–रुक्मिणी मंदिराच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त नऊ दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिलांसाठी दांडिया कार्यक्रमाचाही समावेश आहे. घटस्थापना आणि भजन संध्येमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी नगरसेवक संपत बारस्कर म्हणाले की, सण–उत्सवांच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जपली जाते. हा सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांना ऊर्जा व प्रेरणा देणारा ठरतो. कुटुंबातील महिलांमुळे कुटुंब शैक्षणिक, सुसंस्कृत आणि धार्मिक बनण्यास मदत होते. त्यामुळे धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपताना महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला राजाभाऊ मुळे, ह.भ.प. ऋषिकेश महाराज खोसे, ह.भ.प. हरिहार चाळक महाराज, युवराज चव्हाण, कारभारी शेंडे, सचिन पवार, दीपक दहे यांच्यासह अनेक भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवीच्या जयघोषात आणि भक्तिगीतांच्या सुरांत हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

# काळाच्या पडद्याआड... मुरली मामा अडसूळ!

### मुंबईत कष्टाने संसार उभा केला; पण मन मात्र कायम हिवरे कोरड्याच्या मातीतच रमले!



हिवरे कोरडा विशेष लेख

माणूस आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी, कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी गाव सोडतो आणि परक्या शहरात जाऊन आयुष्यभर कष्ट करतो. मात्र, त्याचे मन कायम आपल्या गावाच्या मातीशी जोडलेले असते. अशाच गावावर जीवापाड प्रेम करणाऱ्या, मनमिळाऊ स्वभावाच्या आणि प्रत्येकाशी आपुलकीने वागणाऱ्या मुरली मामा अडसूळ यांनी आज काळाच्या पडद्याआड जात अखेरचा निरोप घेतला. त्यांच्या निधनाने हिवरे कोरडा गावाने एक प्रेमळ, दिलदार आणि सर्वांना आपलंसं करणारा माणूस गमावला आहे.

सन १९७१ मध्ये आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी मुरली मामा हिवरे कोरडा येथून मुंबईला गेले. कष्ट, प्रामाणिकपणा आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी मुंबईत आपले आयुष्य घडवले. भारतातील प्रसिद्ध कंपनी असलेल्या रायली वुल्फ येथे त्यांनी नोकरी केली. त्या काळात नोकरीच्या माध्यमातून त्यांनी आपल्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. मुंबई आणि कल्याण परिसरात वास्तव्य करताना त्यांनी आपल्या संसाराचा गाडा यशस्वीपणे पुढे नेला.

मुरली मामांना तीन मुले होती. तिन्ही मुलांनी व्यवसायाच्या माध्यमातून आपापले स्थान निर्माण केले. त्यापैकी एक मुलगा कल्याण येथे, तर दोन मुले नगर परिसरात व्यावसायिक म्हणून कार्यरत आहेत. मुलं, सुना, नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार होता. आपल्या मुलांनी प्रगती करावी, संसारात स्थिर व्हावे आणि कुटुंबाचा नावलौकिक वाढवावा, हीच त्यांची मनापासून इच्छा होती. कष्टातून उभ्या केलेल्या संसाराचा विस्तार आणि मुलांची प्रगती हा त्यांच्या आयुष्याचा आनंद होता. मात्र, परिवार मोठा असला, मुलं कल्याण आणि नगर परिसरात स्थायिक झाली असली, तरी मुरली मामांचे मन मात्र कायम आपल्या मूळ गावी हिवरे कोरडा येथेच रमायचे.

नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर ते गावात अधिक काळ राहू लागले. गावातील माणसं, गप्पागोष्टी, परिचित चेहरे आणि मातीचा सुगंध हाच त्यांच्या आनंदाचा खरा ठेवा होता. मुलांनी त्यांना शहरात राहण्याचा आग्रह केला, तरी त्यांचे मन गावातच गुंतलेले असायचे. ''मला इथे करमत नाही, मी गावीच राहतो,'' असे ते मुलांना नेहमी सांगत असत. या साध्या वाक्यात त्यांच्या मनातील गावाविषयीची ओढ, माणसांविषयीचे प्रेम आणि आपल्या जन्मभूमीशी असलेले अतूट नाते सामावलेले होते. काही महिन्यांपूर्वीच त्यांच्या पत्नीचे निधन झाले होते. आयुष्याच्या उत्तरार्धात हा मोठा दुःखद प्रसंग त्यांच्या वाट्याला आला. तरीही गावातील माणसांच्या सहवासात राहणे, त्यांच्याशी बोलणे आणि आपुलकीचे संबंध जपणे, यातच त्यांना समाधान मिळत असे. मुरली मामांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ आणि मनमिळाऊ होता. गावातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाशी ते आदराने बोलत असत. त्यांच्या बोलण्यात नम्रता, वागण्यात आदर आणि स्वभावात माणुसकी होती. कोणालाही दुखावणार नाही, अशी त्यांची बोलण्याची पद्धत होती. त्यामुळेच गावातील प्रत्येकाच्या मनात त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांची ओळख केवळ एका कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती अशी नव्हती, तर गावातील सर्वांना आपलेसे वाटणारे 'मुरली मामा' अशी होती.

मुरली मामांसाठी गाव म्हणजे केवळ राहण्याचे ठिकाण नव्हते, तर त्यांच्या आयुष्याचा आनंद, समाधान आणि जगण्याचे खरे कारण होते. मुंबईत अनेक वर्षे नोकरी करून संसार उभा केला, मुलांना त्यांच्या पायावर उभे केले; पण निवृत्तीनंतर त्यांना गावच्या मातीचीच ओढ लागली. शहरातील सुखसोयींपेक्षा गावातील माणसांचा सहवास त्यांना अधिक प्रिय होता. त्यांच्या जगण्यातून गावाशी असलेले नाते किती घट्ट असते, याची प्रचिती येत होती.

मात्र, नियतीला काही वेगळेच मान्य होते. हिवरे कोरडा येथे आपल्या घरी असतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. ज्या गावाच्या सहवासात त्यांना अखेरपर्यंत राहायचे होते, त्याच गावातील आपल्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी समजताच गावातील परिचितांमध्ये हळहळ व्यक्त झाली. आज मुरली मामा आपल्यात नाहीत. त्यांची घरातील उपस्थिती, त्यांचे प्रेमळ बोलणे, गावातील माणसांशी मारलेल्या गप्पा आणि प्रत्येकाशी जपलेले जिव्हाळ्याचे नाते आता आठवणींचा भाग बनले आहे. त्यांच्या मोठ्या परिवारासाठी हा मोठा दुःखाचा क्षण आहे. मुलं, सुना, नातवंडे आणि आप्तस्वकीयांच्या आठवणींत त्यांचे प्रेमळ व्यक्तिमत्त्व कायम जिवंत राहील. आयुष्यभर कष्ट करून संसार उभा करणारा हा माणूस निवृत्तीनंतर मात्र गावच्या मातीशी एकरूप झाला. पैसा, शहरातील सोयी आणि सुखापेक्षा आपल्या माणसांचा सहवास अधिक महत्त्वाचा असतो, हे त्यांनी आपल्या जगण्यातून दाखवून दिले.

मुरली मामा अडसूळ यांचा जीवनप्रवास एकच संदेश देतोमाणूस कितीही दूर गेला, कितीही मोठा झाला, तरी त्याच्या मनात आपल्या गावासाठी आणि माणसांसाठी एक खास जागा कायम असते.

मामा, आता तुमची गावातील उपस्थिती दिसणार नाही, तुमचा प्रेमळ आवाज ऐकू येणार नाही; पण हिवरे कोरड्याच्या मातीशी असलेले तुमचे नाते आणि तुमच्या आठवणी कायम जिवंत राहतील. तुमच्या प्रेमळ स्वभावाची आणि गावाविषयीच्या ओढीची आठवण सदैव मनात राहील. भावपूर्ण श्रद्धांजली!

**मुरली मामा अडसूळ यांना विनम्र अभिवादन! त्यांच्या आत्म्यास शांती लाभो आणि अडसूळ कुटुंबीयांना या दु:खातून सावरण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.**

**शब्दांकन : पत्रकार संतोष कोरडे**

# नागरिकांनी खचून जाऊ नये, शासन आपल्या पाठीशी खंबीर - आमदार काशिनाथ दाते सर

### राज्यातील दुष्काळग्रस्तांना विविध सवलती व उपाययोजना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** खरीप हंगाम २०२६ मधील प्रतिकूल परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या दुष्काळाच्या संकटात नागरिकांनी खचून जाऊ नये, शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असून दुष्काळग्रस्तांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना व सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत, असा विश्वास आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३०५ तालुके अंतिमतः दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करून विविध सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला असून, या निर्णयाची माहिती पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने आमदार दाते सर यांनी शासन निर्णयातील महत्त्वपूर्ण तरतुदी स्पष्ट केल्या.

महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन विशेष बाब म्हणून विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे प्रतिकूल परिस्थितीचा सामना करणाऱ्या ग्रामीण जनतेला दिलासा मिळण्याची अपेक्षा असून, संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे महत्त्वाचे असल्याचेही आमदार दाते सर यांनी सांगितले. या शासन निर्णयानुसार दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जांच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या चालू वीजबिलात नियमानुसार सवलत तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी अशा महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. रोजगार हमी योजनेअंतर्गत अधिकाधिक कामे सुरू करण्यासाठी निकषांत शिथिलता देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि विद्यार्थ्यांना आवश्यक दिलासा मिळणार आहे. दुष्काळाच्या काळात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषिपंपांची वीजजोडणी खंडित न करणे, शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये यासाठी व्यवस्था करणे आणि पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे अशा उपाययोजनांचाही समावेश आहे. याशिवाय जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यावर शासनाने भर दिला आहे.

> **दुष्काळाच्या संकटात नागरिकांनी निराश होऊ नये. शासनाने जाहीर केलेल्या सवलती व उपाययोजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. शेतकरी, शेतमजूर, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे,**
>
> **आमदार काशिनाथ दाते सर**
> **(विधानसभा सदस्य)**

पीक नुकसानीबाबत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीसंदर्भातही शासन निर्णयात महत्त्वाची तरतूद करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या तालुक्यांतील शेतकऱ्यांना पीक नुकसानीची मदत विहित कार्यपद्धती पूर्ण केल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी संबंधित विभागांकडून मिळणाऱ्या अधिकृत सूचना आणि पुढील प्रशासकीय कार्यवाहीकडे लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले असल्याचे आमदार दाते सर यांनी सांगितले.

(पान १ वरून)

## केडगावमधील घरफोडीचा अवघ्या २४ तासांत छडा

आल्यानंतर निघून गेले. श्रद्धा जाधव घरी परतल्यावर बेडरूममधील कपाटातील ड्रॉवर उचकटून सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे उघडकीस आले. या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला.

पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस व कर्मचाऱ्यांनी संशयित विवेक वहाडणे व त्याच्या अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरीस गेलेला सर्व आठ लाख ६२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, डीवायएसपी दिलीप टिपरसे यांच्या सूचनेनुसार सपोनि विशाल चिटणीस, अंमलदार बाळकृष्ण दौंड, साबीर शेख, राहुल शिंदे, विनोद बोरगे, विशाल दळवी, शिरीष तरटे आदींनी ही यशस्वी कारवाई केली.

## दिव्यांग केंद्रासाठी जागा व इमारत उपलब्ध करून देणार - आयुक्त

दिव्यांग व्यक्तींबाबत काही वेळा तिरस्काराची भावना दिसून येते. मात्र, प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या क्षमतांचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सन्मान केला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये कोणतीही कमतरता नसते. त्यांची स्मरणशक्ती उत्तम असते आणि त्यांना सांगितलेले काम ते अचूकपणे करण्याची क्षमता बाळगतात. त्यामुळे त्यांना योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. महानगरपालिकेने राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, मुलांना देवाघरची फुले म्हटले जाते. दिव्यांग विद्यार्थ्यांकडे पाहिल्यानंतर त्यांच्या क्षमतेची आणि बुद्धिमत्तेची जाणीव होते. अनेक आव्हानांचा सामना करत शिक्षक या विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करतात. त्यांच्या या मेहनतीला सलाम केला पाहिजे. त्याचप्रमाणे मुलांचे संगोपन करून त्यांना घडविण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या माता–पित्यांचेही योगदान महत्त्वाचे आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमेश शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रशांत कुलकर्णी यांनी केले. विद्यार्थ्यांच्या पालक गीता टेमक–वामन यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी आभारही मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी केंद्रातील विशेष शिक्षक महेश बानकर, उमेश शिंदे आणि काशिनाथ साबळे यांनी परिश्रम घेतले.

## दिवाळी तोंडावर, पेन्शनर्सचा आक्रोश; महापालिकेच्या प्रवेशद्वारात हलगीचा कडकडाट!

प्रशासनाने विनाविलंब अदा करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. पाचव्या वेतन आयोगाच्या थकीत फरकासोबतच सहाव्या वेतन आयोगाचे आठही हप्ते अद्याप मिळाले नसल्याचा मुद्दा आंदोलनादरम्यान उपस्थित करण्यात आला. या प्रलंबित हप्त्यांची एकूण रक्कम अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची आर्थिक देणी मिळण्यासाठी वारंवार मागणी करावी लागत असल्याने आंदोलनकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रलंबित हप्ते दिवाळीपूर्वी अदा करावेत, अशी मागणी करण्यात आली. दिवाळीसारखा महत्त्वाचा सण जवळ आला असताना घरखर्च, किराणा, औषधोपचार आणि इतर जीवनावश्यक खर्चांची व्यवस्था करण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पैशांची गरज आहे. अशा परिस्थितीत थकीत वेतन फरक आणि प्रलंबित हप्ते मिळत नसल्याने त्यांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम होत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. हक्काची रक्कम मिळविण्यासाठी सणासुदीच्या काळात आंदोलन करावे लागत असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली. महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियमित पेन्शन वेळेवर मिळत नसल्याचा मुद्दाही आंदोलनात उपस्थित करण्यात आला. निवृत्त कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन गरजा आणि औषधोपचारांचा खर्च प्रामुख्याने पेन्शनवर अवलंबून असतो. त्यामुळे पेन्शनच्या रकमेसाठी प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने निश्चित वेळापत्रकानुसार पेन्शन जमा करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. दरमहा पेन्शनची रक्कम पाच तारखेपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशी संघटनेची प्रमुख मागणी आहे. थकीत वेतन फरक, प्रलंबित हप्ते आणि नियमित पेन्शन या तिन्ही प्रश्नांवर ठोस निर्णय होईपर्यंत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या अडचणी दूर होणार नाहीत, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

## पिचडगावात वहिवाट रस्ता दशकानंतर खुला

चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील कार्यकर्ते कारभारी गरड, दत्तात्रय गटकळ, कानिफनाथ कदम, ज्ञानेश्वर जंगले, रमेश भक्त, रावसाहेब कडू, प्रशांत चौधरी, हरीभाऊ तुवर, मिनीनाथ घाडगे, ज्ञानेश्वर अरगडे यांच्यासह आदी उपस्थित होते.

## बुऱ्हानगर देवीला साडी-चोळी अर्पण

यावेळी माजी महापौर सुरेखा कदम, रोहिणी शेंडगे, मंगल लोखंडे, सलोनी शिंदे, वैभवी कदम यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. संजय शेंडगे, दत्ता कावरे, विक्रम राठोड, श्याम नळकांडे, योगीराज गाडे ,सुरेश तिवारी, सचिन शिंदे, योगेश गलांडे, प्रा. अंबादास शिंदे, प्रताप गडाख, डॉ. श्रीकांत चेमटे, अरुण झेंडे, आबा गुंड, लोकेश बर्वे, खंडागळे, महेश शेळके, अमित लढा, शेखर आढाव, अनिकेत आरडे, विष्णू थोरात आदी उपस्थित होते. मंदिराचे पुजारी ॲड. भगत यांच्या उपस्थितीत धार्मिक विधी पार पडले.

स्वर्गीय अनिल राठोड यांनी सुरू केलेल्या परंपरेचे जतन करत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी धार्मिक श्रद्धा आणि संघटनात्मक बांधिलकीचा प्रत्यय या उपक्रमातून दिला.